# राधानगरी महाविद्यालय,राधानगरी

ता. राधानगरी, जिल्हा - कोल्हापूर

आणि

# पार्वतीबाई मोरे महाविद्यालय,सरवडे

ता. राधानगरी, जिल्हा-कोल्हापूर

या संस्थांमधील

# सामंजस्य करार

## MEMORANDM OF UNDERSTANDING

Parvatibai More Mahila Mahavidyalaya
Esta.2018
Dist. Kolhapur
Sarawade Tal. Radhanagari

Mahavidhyalya, R... Reg Aug 1991 ... IDS...

# शैक्षणिक सामंजस्य करार

राधानगरी महाविद्यालय,राधानगरी आणि पार्वतीबाई मोरे महाविद्यालय,सरवडे या दोन महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांच्या ज्ञानवृध्दी बरोबरच सर्वांगीण विकासासाठी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर याच्या आदेशान्वये शैक्षणिक सामंजस्य करार करणेत येत आहे.

मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यांचे संवर्धन आणि विकसन करणे हे कराराचे ध्येय आहे. मराठी शिक्षकांच्या दर्जेदार अध्यापनासाठी,ज्ञान प्रसार संदर्भात विविध उपक्रम राबविले जातील.तसेच महाविद्यालयातील चर्चासत्रे तसेच कार्यशाळांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमधे मराठी भाषेचे आणि साहित्याचे विकसन करण्याच्या दृष्टीने निबंधलेखन, कथालेखन,काव्यलेखन, कथाकथन, काव्यवाचन अशा विविध स्पर्धांचे आयोजन केले जाणार आहे.

मराठी विभाग राधानगरी. महाविद्यालय, राधानगरी व मराठी विभाग पार्वतीबाई मोरे महाविद्यालय,सरवडे या संस्था एकमेकांबरोबर सामंजस्य करार करत आहेत.

या कराराची उद्दिष्टये खालील प्रमाणे निश्चित करण्यात आलेली आहेत.

## उद्दीष्टये

१. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यांचे संवर्धन करणे.

२.चर्चासत्र, कार्यशाळा, परिसंवाद, काव्यसंमेलन, संयुक्त बैठका यांचे

आयोजन करणे.

३. विद्यापीठीय अभ्यासक्रम, निबंध, वक्तृत्व, वाद-विवाद, प्रश्नमंजुषा, कथालेखन, काव्यलेखन, काव्यवाचन, कथाकथन, स्पर्धांचे आयोजन करणे.

४.स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रासाठी सहकार्य करणे.

५.व्यक्तिमत्व विकास प्रकल्प, कौशल्य विकास प्रकल्प,

सर्जनशील लेखन, उपयोजित मराठी लेखन प्रकल्प राबविणे.

६.शैक्षणिक संपर्क क्लासचे आयोजन करणे.

७.परस्पर हिताच्या शैक्षणिक बाबींमध्ये तसेच प्रशिक्षणामध्ये सहकार्य करणे.

८.विविध उपक्रमाचे आयोजन करण्यासाठी परस्परांशी सहकार्य करणे.

## अटी

१.आपआपल्या खर्चाने एकमेकांना सहकार्य करणे.

२.परस्पर सामंजस्य करारातील उदाहरणांचे नुतनीकरण करणे आणि परस्परांच्या लेखी करारांची कोणत्याही क्षणी समाप्ती केली जाऊ शकते. साठ दिवसांच्या पूर्व लेखी सूचनेनुसार दोन्हीपैकी कोणत्याही संस्थेला करार संपुष्टात आणता येईल.

३.कोणत्याही महाविद्यालयांस प्रवास व भोजन भत्ता देणे बंधनकारक नाही.

४.सदर परस्पर सामंजस्याचा कराराचा कालावधी पाच वर्षानंतर संपुष्टात येईल. परस्पर सहमतीने आणखी पाच वर्षासाठी हा करार पुढे चालू ठेवता येईल. यासाठी निश्चित दिनांक व लेखी अनुमती यांची आवश्यकता बंधनकारक असेल.

## समन्वय

१.सदर कराराची जबाबदारी, व अंमलबजावणीसाठी महाविद्यालयाचे समन्वयक व प्राचार्य काम पहातील.

२.सदर सामंजस्य करार कायदेशीर भाषेमध्ये तसेच कायदेशीर अटीशी अधीन राहून दोन प्रतीमध्ये अंमलात येत आहे.

३.खालील स्वाक्षऱ्यांचा सदरहू परस्पर सामंजस्य करार हा पुढील समन्वियक अधिकाऱ्यांत होत आहे.

प्रा.डॉ.विश्वास पाटील
समन्वयक

डॉ.डी.एस.मोरुस्कर
प्राचार्य
प्राचार्य
राधानगरी महाविद्यालय, राधानगरी

प्रा.जयवंत सुतार
प्राचार्य
प्र. प्राचार्य
पार्वतीबाई मोरे महिला महाविद्यालय
(कला, वाणिज्य व विज्ञान)
सरवडे, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर

प्रा.बी.के.पाटील
मराठी विभाग प्रमुख

स्थळ : राधानगरी
दि : २६।०८।२०२३

Mahavidhyalya,
Reg
Aug 1991